# अर्थ

पैसे आहेत म्हणजे सुख आहेच हे जसे बरोबर नाही तसेच पैशाशिवाय सुख मिळू शकते असे मानणेही बरोबर नाही. ढोंगी लोक पैशाला कितीही नावे ठेवोत पैशाशिवाय जगाचे पान हलत नाही. परमेश्वरी इच्छेशिवाय पान हलत नाही असे आपण म्हणतो ते पान पैशाच्या माध्यमातून हलते. त्यामुळे पैसे मिळवणे आणि ते सहज सांभाळता येतील असे मिळवणे हे निरामय आरोग्याच्या दृष्टीने अत्यावश्यक असते.

सांभाळता येण्या पलिकडे पैसे असणे अगर पैसेच नसणे हे दोन्ही सारखेच अनर्थकारी ठरते. आपण पैसे मिळवतो ते खर्च करण्याकरता मिळवतो. म्हणजेच आपण ते पैसे दुसऱ्या कोणाला तरी देतो. म्हणजेच तो ते पैसे मिळवतो. पैशाला म्हणूनच "चलन" असे नाव आहे. पैसे चल राहिले पाहिजेत. आले पाहिजेत गेले पाहिजेत. धरून ठेवू म्हटले की दुःख आलेच. त्यामुळे पैसे हे वाईट नसून त्यामागची वृत्ती ही दुःखकारक असते. पैसे कधीच दुःखकारक नसतात.

पैशाविषयी आपली दुटप्पी वृत्ती दुःखाचे कारण बनते. त्यातच "पैसा या प्यार" असे तिढे समोर टाकले जातात. आपल्याला दोन्ही हवे हेच लक्षात यायला वेळ जातो. एक प्रेम तरी मिळेल किंवा पैसे तरी मिळतील असा भ्रम उत्पन्न झाल्यास दोन्ही न मिळण्याची शक्यता जवळजवळ नक्की. आपल्याला सर्वांना खूप पैसे मिळवायला हवे आणि ते प्रेमापोटी खर्च करून टाकायला हवे. पैशासाठी काहीही करायला तयार होणाऱ्यांनी "जोडोनिया धन उत्तम वेव्हारे उदास विचारे वेंच करी" ही पंक्ती पुनःपुन्हा अभ्यासण्यासारखी आहे. उत्तम प्रकारे धन जोडायलाच पाहिजे.

धन जोडण्यात उत्तम मध्यम आणि नीच असे प्रकार असतात.

चोऱ्या माऱ्या करून, खून दरोडे घालून, शेअर बाजारात लांड्या लबाड्या करून पैसे मिळविणे, अडवणूक करून पैसे मिळविणे हा नीच प्रकार. फक्त पैशाकडे लक्ष ठेवून भावभावनांना थारा न देता पण कोणतेही गैरव्यवहार न करता पैसे मिळविणे हा मध्यम प्रकार तर पैसे मिळविण्यासाठी वासनाशून्य प्रयत्न करताना यदृच्छेने जे पैसे मिळतील ते जोडत जाणे हा उत्तम प्रकार. तर भरपूर पैसे मिळविलेच पाहिजेत पण जेव्हा ते खर्च करायची वेळ येईल तेव्हा अजिबात वाईट वाटू न देता ते खर्च करणे हा उदास विचार. ह्याचे कारण असे की पैसा हा आपला कधीच नसतो. समजा तुम्ही खर्चच करायचा नाही असे ठरविले तर कितीही पैसे असले काय नसल्यासारखेच असतात. आणि ते व्याजापोटी वाढत गेले तरी त्याचा काहीच उपयोग नसतो कारण ते तुम्ही वापरायचे नाही असे आधीच ठरविलेले असते. तुम्ही पैसा देताना फक्त तुमचा असतो. आणि क्षणात तो दुसऱ्याचा होतो.

अर्थनियोजन फसले तर जीवनात अनर्थ होतोच. स्वास्थ्य मग फारच दूर राहिले. उत्तम स्वास्थ्यासाठी पैसे खर्च करायला लागतात ते असायलाच हवेत. पण मिळविलेले पैसे ताब्यात ठेवण्यासाठी पुरा दिवस जात असेल आणि त्यामुळेच स्वास्थ्य बिघडत असेल तर अर्थनियोजन फसले समजा.